॥ वेड्या बहिणीची रे वेडी माया ॥

गायिकाः आशा भोसले
गीतः संजीव
संगीतः वसंत मोहिले

सोनियाच्या ताटीं, उजळल्या ज्योती
ओवाळीतें भाऊराया रे,
वेड्या बहिणीची रे वेडी माया! ॥ धृ. ॥

माया माहेराची पृथ्वीमोलाची
साक्ष याला बाई चंद्रसूर्याची
कृष्ण द्रौपदीला सखा रे भेटला
पाठीशीं राहुं दे छाया रे! ॥ १ ॥

चांदीचें ताट, चंदनाचा पाट
सुगंधी गंध दरवळे, रांगोळीचा थाट
भात केशराचा, घांस अमृताचा
जेवूं घालितें भाऊराया रे! ॥ २ ॥

नवलाख दिवे हे निळ्या आभाळीं
वसुंधरा अशी चंद्रा ओवाळी
नक्षत्रांची सर, येई भूमिवर
पसरी पदर भेट घ्याया
चंद्र वसुधेला सखा रे भेटला
पाठीशीं राहुं दे छाया रे! ॥ ३ ॥

पंचप्राणांच्या वाती, उजळल्या ज्योती
वेड्या मायेची घेऊनी आरती
ओवाळीतें माझी काया, भाऊराया! ॥ ४ ॥